शासकीयअभियांत्रिकीमहाविद्यालय, अमरावती - ४४४६०४
(महाराष्ट्रशासनाचीस्वायत्तसंस्था)
" Towards Global Technological Excellence"
दू.क्र. (०७२१) २५३१९३०, २५३१९२९ फॅक्स — (०७२१) २५३१९३१
संकेतस्थळ : www.gcoea.ac.in ईमेल — principal@gcoea.ac.in

**विद्यार्थ्यांना सुचना**

जा. क्र. शाअमअ/विवि/२०२५/ 930
दिनांक :- 24/02/2025

विषय :- शै. वर्ष २०२४-२५ करीता 5th व 7th सत्रामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना CAARY ON Scheme लागु करणे बावत..

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण-२०२५/ई-९७०२२०/विशि-३ दिनांक १०/०२/२५
२) Term grant Scheme २०२४-२५ No.GCoEA/Dean Acad/2024/4239 Date10/09/24

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षी जे विद्यार्थी 5th व 7th सेमिस्टर करीता प्रवेशास अपात्र आहे. अश्या सर्व विद्यार्थ्यांकरीता २०२४-२५ या वर्षी संदर्भ क्र. १ चे शासन निर्णय नुसार Carry on Scheme लागु केलेली आहे, तरी अशा सर्व विद्यार्थ्यांनी खालील अटींचे अधिन राहून विद्यार्थी विभागात दिनांक २८/०२/२५ पुर्वी आपले प्रवेश निश्चित करावे. अश्या विद्यार्थ्यांनी प्रवेश फॉर्म (A-१) प्रवेश शुल्क पावती विद्यार्थी विभागात जमा करून आपला प्रवेश निश्चित करावयाचा आहे. प्रवेश निश्चित न केल्यास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

तसेच यापूर्वी पाचव्या सेमिस्टरचे परीक्षा फी भरून पावती विद्यार्थी विभागात जमा करावी.

१) शै. वर्ष २०२४-२५ मध्ये ५ व्या सत्रामध्ये प्रवेशास अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांना यापुर्वीच प्रवेश दिलेला आहे परंतु अश्या प्रवेशित विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी दिलेली नव्हती तरी अश्या विद्यार्थ्यांची ५ व्या व ६ व्या सत्राची परीक्षा सम सत्र (उन्हाळी-२५) मध्ये एकत्र घेण्यात येईल व त्याची कुठलीही पात्रता विचारात न घेता सदर परीक्षेला बसता येईल.
२) यापुर्वी Term Grant Scheme मध्ये ७ व्या सत्रा करीता प्रवेशास अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला नव्हता परंतु संदर्भ १ नुसार अशा सर्व अपात्र विद्यार्थ्यांना २०२४-२५ मध्ये प्रवेशास पात्र करण्यात येत आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांची कुठलेही पात्रता न विचारात घेता ७ व ८ वे सत्राची परीक्षा उन्हाळी-२५ या परीक्षे मध्ये एकत्र घेण्यात येईल.
३) अशा सर्व विद्यार्थ्यांचे ७ वे सत्र संपले असल्यामुळे या Scheme अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना ७ वे सत्राचे विषय Self Learning Mode मध्ये पुर्ण करावे लागेल तसेच त्यांचे प्रात्याक्षिक संबंधीत विभाग पुर्ण करून घेतील.
४) या पुर्वीच्या Term grant Scheme अंतर्गत ५ व्या सत्रा मध्ये प्रवेशास अपात्र काही विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नसेल तर अशे विद्यार्थी या स्किम अंतर्गत पुन्हा प्रवेश घेऊ शकतात.
५) या योजने अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे विषम सत्राचे MSE व TA गुण ESE मधील त्याचे गुणाचे प्रमाणात देण्यात येईल. (Praportionate - PR)

६) या योजने अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांनी संस्थेचे लागु असलेले संपूर्ण शुल्क भरून आपले प्रवेश निश्चित करावे.

७) यापुर्वी Term grant स्किम अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरलेले नसल्यामुळे त्यांनी परीक्षा शुल्क भरून घ्यावे.

८) या स्किम अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांची विषम (ODD) सत्राची प्रात्याक्षिके पुर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची व विभागाची राहील.

९) शै. वर्ष २०२५-२६ करीता अंतिम वर्षा करीता संदर्भ क्र. २ चे परीपत्रकानुसार Term grant scheme लागु राहील.

१०)या स्किम अंतर्गत सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या नमुना प्रमाणे बंधनपत्र भरून देणे बंधनकारक राहील.

११) सदरची संधी (संदर्भ -१ अन्वये) अत्यंत अपवादात्म परिस्थिती मध्ये केवळ शै. वर्ष २०२४-२५ करीता लागु राहील.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
अमरावती

प्रतिलिपी :- सर्व विभाग प्रमुख, सदर बाबत आपले अधिनस्त विद्यार्थ्यांना तात्काळ सुचित करावे.

१) स्थापत्य अभि. २) यंत्र अभि. ३) विद्युत अभि.

४) अणुविद्युत अभि. ५) संगणक अभि. ६) उपकरणीकरण अभि.

७) माहिती तंत्रज्ञान ८) परिक्षा नियंत्रक, यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता

९) सर्व वर्ग प्रतिनिधींनी सदर सुचना संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांच्या Whatsapp group व्दारे द्यावी.

**बंध पत्र ( Undertaking)**

विषय :- Carry On Scheme अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना भरून दयावयाचे बंधपत्र

१) या स्किम अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना विषम सत्रातील विषयाचे अभ्यासक्रम Self learning mode मध्ये पुर्ण करणे बंधनकारक राहील.

२) निर्धारीत कालावधीत मी पदवी पूर्ण करू शकलो/ शकले नाही तर संस्थेच्या घोषित केलेल्या समकक्ष विषयाची परीक्षा दयावी लागेल याची मला जाणीव आहे.

३) मी संस्थेत आवश्यक ती शिस्त पाळील. संस्थेचा शिस्तीला बाधा येईल असे कोणतेही वर्तन करणार नाही.

४) संस्थेच्या शिस्तीच्या नियमाचा भंग होईल असे काही मी केल्यास माझी संधी रद्द केल्या जाईल याची मला जाणीव आहे.

५) या अंतर्गत संधीची सुविधा घेत असताना काही संस्थास्तरावर तांत्रिक अडचण आल्यास माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

६) सदर संधी अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ ही शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता लागु राहील याची मला जाणीव आहे.

सही

दिनांक :-

स्थळ

विद्यार्थ्याचे पूर्ण नाव :-

नोंदणी क्रमांक:-

अभ्यासक्रमाचे नाव :-